
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २००५



# अनुबंध



REFBK-0014837
REFBK-0014837

## कृ.ब.निकुम्ब

५८६५३
१८।३।६९

2004

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थानक
अनुक्रम 58653 दि:
क्रमांक 2004 नोंद दि: 18/3/69

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# अनुबंध

कृष्ण बलवन्त निकुम्ब

REFBK-0014837
REFBK-0014837
९८८३६

व्हीनस प्रकाशन पुणें

आवृत्ति पहिली : सप्टेंबर १९६५

© कृ. ब. निकुम्ब

चित्रकार : द. ग. गोडसे

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
' तपश्चर्या '
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव : पुणें २

मूल्य : रुपये २·७५

वृद्ध चंदनास –

ज्यानें माझी सारी जपणूक अखेर व्यर्थ ठरविली.

'उर्मिला' हा माझा दुसरा काव्यसंग्रह १९५४ मध्यें प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या, गेल्या दहा वर्षांतील निवडक कविता या संग्रहांत समाविष्ट केलेल्या आहेत.

मुद्रणांत कांहीं आशय-हानिकारक दोष घडले आहेत. त्यांतील महत्त्वाच्या स्थळांचा निर्देश शुद्धिपत्रांत केला आहे. वाचनाच्या आधीं शुद्धिपत्रावरून अवश्य ती दुरुस्ती करून घेणें इष्ट.

९-८-१९६५,<br>
४०३६, बेळगांव.

कृ. ब. निकुम्ब

## उज्ज्वला

" उत्कट भावना, सौंदर्यासक्ति आणि रचनेची सुश्लिष्टता या श्रेष्ठ काव्याला आवश्यक असलेल्या तीनहि गुणांचा आढळ ' उज्ज्वले ' च्या पानापानांतून होतो... या संग्रहांतून निकृष्ट किंवा दुष्ट रचनेचे नमुने काढणें जवळ जवळ अशक्यच आहे." —कुसुमाग्रज

" मला तुमचा काव्यसंग्रह मनापासून आवडला."

—प्रा. रा. श्री. जोग.

## उर्मिला

" प्रीतीचा एवढा नाजूक आविष्कार इतरत्र सांपडणें कठीण आहे...निकुम्बांच्या सूक्ष्म कल्पनाशक्तीनें भोंवतींच्या जगांतील लहान लहान सौंदर्येंहि मार्मिकपणें टिपून घेतलेलीं दिसतात. चारसहा ओळींची चुटकेवजा कविता दिसावयास, पण आंत भरून राहिलेला सुगंध एवढा प्रभावी कीं, कविता वाचल्यानंतर किती तरी वेळपर्यंत रसिकांनीं त्याच धुंद वातावरणांत राहावें."

—केसरी

" उर्मिला सर्व दृष्टींनीं सुंदर आहे. तुमच्या कवितेची स्निग्ध व भावगंभीर प्रवृत्ति या संग्रहांत उत्कट व लालित्यपूर्ण स्वरूपांत प्रकट झाली आहे. भावनेंत हृदयंगमता आणि शब्दांत सौंदर्य आहे. उर्मिलेच्या कपाळीं उपेक्षेचा शाप होता, परंतु ही उर्मिला रसिकांच्या अंतःकरणांत गौरवाचें व स्नेहाचें स्थान मिळवील, यांत मला शंका वाटत नाहीं."

—कुसुमाग्रज

# पानसांखळी


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उघड्या डोळ्यांनीं | १ |
| २ | माझा कणी-कोण्डा | २ |
| ३ | चंदन | ३ |
| ४ | व्रत | ४ |
| ५ | प्रश्नोत्तर | ५ |
| ६ | अन्ध | ६ |
| ७ | दुष्ट | ७ |
| ८ | कसब | ८ |
| ९ | लेणें | ९ |
| १० | अशान्त | १० |
| ११ | डोह | ११ |
| १२ | वेड | १२ |
| १३ | गे तुजला सांगू का ? | १३ |
| १४ | बान्ध | १४ |

पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| १५ | वारंवार उसळून | १५ |
| १६ | धीट | १६ |
| १७ | शपथ | १७ |
| १८ | न कळत येतों | १८ |
| १९ | उभा नटतों हर्षानें | २० |
| २० | स्पर्श | २१ |
| २१ | अंकुर | २२ |
| २२ | सावध | २३ |
| २३ | अट | २४ |
| २४ | झूल | २५ |
| २५ | अनुबन्ध | २६ |
| २६ | खेळ | २८ |
| २७ | जोंवर सन्थ आहे लाट ! | २९ |
| २८ | लाज | ३० |
| २९ | खुणा कालच्या वादळीं | ३१ |
| ३० | निर्विकार | ३२ |
| ३१ | सर | ३३ |
| ३२ | बाकी | ३४ |
| ३३ | सात दिवसांची | ३५ |
| ३४ | वळीव | ३७ |

पृष्ठ

३५ वर्षू नकोस रे असा ३८
३६ तुझ्या थेम्बांचा उतरो ३९
३७ नाहीं मावत डोळ्यांत ४०
३८ तृत ४१
३९ हस्त ४२
४० नातें ४३
४१ पाऊल ४५
४२ खूण ४६
४३ त्यांची आशा, स्वप्नें त्यांचीं–४७
४४ जाब ४८
४५ लव ४९
४४ बळ ५०
४७ सातवें बन्द दार ५१
४८ उगीच कां हें– ५३
४९ कडी ५४
५० माथां कृत्तिकांचा घोंस– ५५
५१ वर निःस्तब्ध आकाश ५६
५२ बंगला रुप्याचा बांधीन ५८
५३ वाचन ५९
५४ चांदणं ६०

पृष्ठ


| | |
|---|---|
| ५५ ऐट | ६१ |
| ५६ आकस्मिकतेनें | ६२ |
| ५७ फेड | ६३ |
| ५८ गळां गौरवाचे हार | ६४ |


*

# अनुबन्ध

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ५ | बिलग | विलग |
| १४ | १५ | बान्धव | बान्धच |
| २३ | ५ | कुटें | कुठें |
| २९ | १० | शब्द होतो धून | जेथें शब्द होतो धून |
| ३० | ९ | उजळत्या | उजळल्या |
| ३४ | ९ | मंगलाची | मंगळाची |
| ३८ | ६ | देतां | देता |
| ३८ | १३ | अंगीपांगी | अंगोपांगीं |
| ३९ | ३ | इथ | इथें |
| ४२ | ६ | इथल्या | इवल्या |
| ४३ | ५ | चौकोनाश | चौकोनाशीं |
| ६२ | १२ | सांवली तोहि | सांवलीनें तोहि |
| ६२ | १४. | जाणीव आहे. | जाणीव आहे: |
| ६२ | १६ | याच्या | त्याच्या |

## उघड्या डोळ्यांनीं

उघड्या डोळ्यांनीं
उखळांत द्याया मस्तक सज्ज मी
मुसळाचा घाव झेलीत-झेलीत
बिलग, विच्छिन्न ओठ गातील
गीत उल्लासाचें—
तुझिया मनाच्या पूर्ण उमलाया षोडश कळा
अतिथी-देवा !

प्रार्थना इतुकी
कपटवेषाचा नको खटाटोप,
नकोच आणिक
अखेरचें तें वरदानाच्या मधाचें बोट !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
78636

## माझा कणी-कोण्डा

माझा कणी-कोण्डा
तुझा सुगरण हात—कुणी निवावा क्षुधार्त
लाविला मीं दीप
गडे, सार सोन-वात—श्रांता उजळावा पंथ
माझी निगराणी
तुझी आंसवांची माया—यावा मोगऱ्याला भर
दर्वळून जावें
ओटी-परस आणिक—वेशीवरचेंहि घर
कधीं पहांटेस
स्वप्न-जागृतीच्या मेळीं—डोळां तरळतें दृश्य :
तुझी तळमळ
माझा रेखाटता बोल—कुणा झालें गीताभाष्य !

## चंदन

माझ्या चंदनी खोडाचा
मंत्र : ' झिजणें-झिजणें ! '
उणें लिम्पायाला माझें
घाली सुगन्धाचें लेणें.

झीज केशरी तयाची
तप्त जीवा लावी उटी
आंत उसले भावना
शान्त, शीतल, गोरटी !

माझें सुख, माझी तृप्ति
हीच देवपूजा त्याची—
निष्काम तें; अपवाद :
इच्छा एक झिजायाची !

झिजतें तें—जीव माझा
होतो आंत आंत गोळा
अडखळे हात आणि
पाणी तरारतें डोळां—

वृद्ध चंदन तें माझें
नित्य जपलें—जपेन
त्याच्यासाठीं—आण त्याची—
जीव ठेवीन गहाण !

## व्रत

तुज जपावें मीं, परि
धर्म तुझा झिजण्याचा
' झिजूं नकोस चन्दना !'
कशी उच्चारावी वाचा ?

म्हटलासी—म्हटशील
माझे पुरवाया छन्द
झिजण्याचा एकमेव
कसा मागावा आनन्द ?

सुख सोलून पाहावें
आंत पिकलें का नाहीं ?
देईल तें म्हणून का
मागूं नभाची नीळाई ?

झीज सोसवत नाहीं,
झीज थांबवत नाहीं,
स्नेहशीला, सांग कशी
तगमग विझावी ही ?

—मीच आतां उचलतों
तुझें झिजण्याचें व्रत
त्यांत—त्यांतच मिटेल
तुझी झीज, माझी खन्त !

## प्रश्नोत्तर

जेव्हां जातां जातां सांज
थबकते मुरडून
टाकी पुसून सहसा
पश्चिमेची लाल खूण
जेव्हां स्तब्ध जळावर
लवे आकाश हळूच
सुरू झालेली नसते
चांदण्यांची कुचकूच
जेव्हां उडत्या पंखाची
पूर्ण मिटतसे गति
श्वास आवरून घेती
तुरे, गवताचीं पातीं
जेव्हां मौनच बोलतें
उत्कंठेच्या तालावर
—तेव्हां प्रश्न माझ्या ओठीं
तुझ्या अधरीं उत्तर !

## अन्ध

दूर तिथें नाहिं कांहिं
   मी निकटीं पाठीशीं
निरखिशि त्या ' नाहीं ' ला
   अन्ध तुझी दृष्टि अशी

अन्ध तुझी दृष्टि, परी
   करहि तुझा केविं पिसा ?
माझा हा स्पर्श उष्ण
   जाणवे न त्यास कसा ?

हंससी वर तूंच पुन्हां—
   पांघरुनी शिष्ट वेड ?
सारे हे प्रश्न विफल—
   अन्ध मीच ! मीच मूढ

## दुष्ट

तुझें पारदर्शी मन
स्पष्ट दिसे तळ त्याचा
तरि फेंकून पाहतों
खडा काळा संशयाचा
विचलित, विद्ध होसी
—मी तों पांघरितों वेड—
" कसा तोडून दाखवूं—
शुद्ध काळजाचा घड ! "
तगमग तुझी आणी
डोळां माझियाहि पाणी—
तरि आंत तृप्त होई
माझ्यांतला दुष्ट कोणी !

## कसब

पानांचा झुबकाच रचावा असला
की न फुलाचा व्हावा आठव
आणि फळाचें भान विरावें
—साधतें तुला तें सहजीं.

शब्दांची आरास अशी माण्डावी
कीं, आशय हलकेंच दडावा
भाव—तयाची कळ हरपावी
—गे पारङ्गत तूं त्यांत.

चुकलें एकच :
मजपासुन हें कसब कसें लपवावें
तें कसब न तूं शिकलीस !

## लेणें

उगारतां तुझ्यावर
झाला पाषाणाचा हात
तुज विन्धिलें शब्दांनीं
मींच माझा केला घात !

आतां डोळे, कान, जिव्हा
गात्र-गात्र शिलामय
संवेदन उरलेलें
एक झुरतें हृदय !

पाषाणाचा देह सारा
आंत वेदना जिवन्त
जगा-वेगळें हें लेणें
होईल का शापमुक्त ?

## अशान्त

मी म्हणतां, ‘मार उडी’  देशिल तूं तनु झोंकुन
तोंडांतिल घोट ‘नको’  म्हणतां मी गिळिशील न
कल माझ्या मौनाचा  ओळखशिल तूं अचूक
म्हणशिल तम सूर्याला  केली जर खूण मूक
निरवुन विश्वास असा  मजवरती तूं निवान्त !
झेलुनि तो भार शिरीं  भ्रांतचित्त मी अशान्त !

## डोह

गे शब्दांचा जर खेळच खेळायाचा
हरवीन तुला तर सहजीं चतुरे, त्यांत
रचिशील भुलावण डोळ्यांतिल रंगांची
मी ओळखीन तें ढोंग तुझें वर्खाचें
जर मूठ झांकुनी पुसशिल एकी-बेकी
सांगेन : रितेपण केवळ त्या तळव्यांत
परि सायासेंही थांग कसा लागावा
मज लोटशील जर डोहीं प्रांजलतेच्या ?

## वेड—

विसरावें, मीं विसरावें
    परि आठवतें सगळेंच—
तो उंच--सखल नदिकांठ
    ती तंद्रीमधली ठेंच
तो तोल पुढें झुकलेला
    ती घट्ट पकड हातांची
देहांतुन चमकुन गेली
    क्षणभरांत कळ बिजलीची
—मज पूल न तो आठवतो
    परि विसरूं कसें तें खोड ?
सलणार, नित्य सलणार
    त्या तिथें लागलें वेड !

## गे, तुजला सांगू का ?

गे, तुजला सांगूं का ?
   सांगण्यांत हित नाहीं
राखूं मी अपुल्याशीं ?
   —उसळुन तें वर येई !

सांगावें ?—सांगेनहि
   धाक न मज शब्दांचा
समजशील तूं भलतें,
   शाप न या शंकेचा

अडखळतों त्यामुळेंच—
   तूं तर विश्रब्ध अशी !
भरंवसा न माझा मज—
   केविं तुला पाडुं फशीं ?

## बान्ध

जें अजून माझें मला उमगलें नाहीं—
सांगावें तुज समजावुन तें
धरिसी आग्रह--
आर्जव मोहक
हळवा रुसवा
लाडिक हुकुमी नजरेची चतुराई !
—निरुपायास्तव,
सांगुन जातों अखेर कांहींबाही—
मात्र उमटतो भाव तुझ्या मुद्रेवर
तृप्तीचा, पूर्तीचा !
क्षणभर गमतें,
फसवणूक ही तुझी नि माझी !
क्षणांत दुसऱ्या परंतु पटतें :
तो शब्दांचा बान्धव फसवा,
इकडे-तिकडे एकच पाणी,
येणें-जाणें नाहीं !

## वारंवार उसळून

वारंवार उसळून
येते आवेगानें सर
हेलावतें डोळ्यांमध्यें
हृदयाचें सरोवर

डोळां आवरितां जळ
आर्त थरारतीं पातीं
त्यांत कडाडते वीज
माझ्या शब्दांची जाळती

आणि माझा दण्ड घोर
कोसळतां थेम्ब एक
तुझ्या प्रीतीचा हिशेब
चुकवीन रोख ठोक

हंसण्याचें भाग्य नसो
नाहीं रडायचें सुख
लेणें लेऊन प्रीतीचें
जन्मा आलें दुःख मूक

—तुझीं पुसाया आंसवें
माझे बांधलेले हात
असा पेटतों म्हणून
उगा तुजला जाळत !

## धीट

धीट तशी तूं !
—तरि न साङ्गशिल स्पष्टपणानें
ओठांवर जें येतें उसळुन
हृदयामधुनी.
उगिच घालशिल हिरव्या-पिंवळ्या स्वप्नांचीं मज
सतरा कोडीं, सात उखाणे !

—ज्ञात न कां मज,
पायिं न रुतल्या कांट्यावरती
उगीच भलता आळ घेउनी
बघशी चटकन मुरडुन मागें—
धीट जरी तूं ?

धीट तशी तूं !

## शपथ

शपथ तुला कीं,
नकोस पाहूं मागें मुरडुन;
सरळ समोरुन
भिडव अशी दृष्टीला दृष्टी !

—नाजुक, नवथर
लज्जेचें तें चढतां पाणी
तुझ्या सदांच्या
दृढ अभिमानी धीटपणावर
—असामान्य विजिगीषेमधुनी जो ये उसळुन—
जातों मी बेहोष होउनी !
भाव शिगेचा तो उरिं धरितां धरवत नाहीं
बेहोषीचें वातचक्र मज भ्रमवित राही
पुनः पुन्हां सोंसाटत नेई !
—जलाल जरि ती
समोरली मज
जित्या विजेची धार पुरवली
खुशाल याहुन—

शपथ तुला कीं,
नकोस पाहूं मागें मुरडुन.

## नकळत येतों--

माहित असतें :
परीटघडिचीं, उपचाराचीं होतिल कांहीं शिष्ट बोलणीं
प्रश्न तटस्थ नि अलिप्त उत्तर,
क्वचित् कुठें वाढंग जरासा
भडकपणाचा वास तयाला
उगिच बोलणें सजवायाला;
लपवायाला आंतुन येतें उचंबळुनि जें !
—आंत मनाचें वस्त्र रेशमी, आरुण, नाजुक,
चुरगळलेलें;
आणिक त्याच्या चुण्याचुण्यांतुन
स्वप्नांची जरतार गुंफुनी
विणलेल्या त्या विविध आकृति
तुझ्या नि माझ्या कधींकाळच्या प्रेमकथेंतिल;
चुण्याचुण्यांतुनि सजीव होऊनि
बघतिल करण्या नाच अनावर
परीटघडिच्या उपचाराच्या
वस्त्रांवरती !—
माहित असतें : असेंच होइल,
—असेंच झालें मागिल भेटिंत—
—आणि तरीहि नकळत येतों
कधींतरी मी
परीघटडिचा

उगीच
नसता
भडक जरा वादंग कराया !

## नकळत येतों--

माहित असतें :
परीटघडिचीं, उपचाराचीं होतिल कांहीं शिष्ट बोलणीं
प्रश्न तटस्थ नि अलिप्त उत्तर,
क्वचित् कुठें वादंग जरासा
भडकपणाचा वास तयाला
उगिच बोलणें सजवायाला;
लपवायाला आंतुन येतें उचंबळुनि जें !
—आंत मनाचें वस्त्र रेशमी, आरुण, नाजुक,
चुरगळलेलें;
आणिक त्याच्या चुण्याचुण्यांतुन
स्वप्नांची जरतार गुंफुनी
विणलेल्या त्या विविध आकृति
तुझ्या नि माझ्या कधींकाळच्या प्रेमकथेंतिल;
चुण्याचुण्यांतुनि सजीव होऊनि
बघतिल करण्या नाच अनावर
परीटघडिच्या उपचाराच्या
वस्त्रांवरती !—

माहित असतें : असेंच होइल,
—असेंच झालें मागिल भेटिंत—
—आणि तरीहि नकळत येतों
कधींतरी मी
परीघटडिचा

उगीच
नसता
भडक जरा वाढंग कराया !

## उभा नटतों हर्षानें

उभा नटतों हर्षानें
यश आगळें जिंकून
सुखावसीं तरी कधीं—
कधीं होसीं न उन्मन

माझ्या वेदनेंत परि
उरीं फुटसी केवळ
रोधूनहि, बारा वाटां
भङ्गे आंसवांची पाळ

धिराव्याचा बोल तुला
वेडे, सुचतच नाहीं—
सोसायला, झुंजायला
मात्र मला बळ येई !

## स्पर्श

मी विसरून गेलों अन्धाराचा रङ्ग--
स्पर्शच केवळ त्याचा आतां
आठवणीमधिं जागा
किंचित् मित्रा,
आतुर,
ऊबदार, मखमाली—
तूं भेटलीस ना, तेव्हांपासुन!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ७४८३६

## अंकुर

मातीचेंच माझें घर
तुझें शिळंधार येणें
हवेंहवेंसें वाटतें
तरी सारें जीवघेणें

शिरीं झेलावा वर्षाव
नाहीं शंकराचा वर
कोसळतें क्षणक्षणां
येतां सरीवर सर

लाज उणीवेची नाहीं
नाहीं वेदनेची क्षिति
फुटे तृप्तीचा अंकुर
एक होतां जळमाती !

## सावध

कधीं बोलतां रंगून
तुझा अडखळे बोल
—किती सावध वागशी :
कुठें जाऊं नये तोल ! —

अंगलगींतहि मग
येतो अचूक परावा
दुखावलें सुख घेई
आंत उलटून चावा

तुला तरी कळतें कां
काय अशी जपतेस ?
कृष्ण सोडून, मिठी कां
अंधाराला घालतेस ?

सात तटांतून तुझ्या
माझी मुक्त रहदारी—
कां हा परवल चुके
अवचित केव्हां तरी ?

वारंवार पुसूनीहि
तिळा उघडत नाहीं
जळ संगमामधलें
पुन्हां दुभंगत राही !

## आठ

शुष्क कण्ठ--पदिं जळते वाळू
श्वास रोखुनी सूर्य उभा वर
मूर्च्छित पडली तळीं स्तब्धता
— चालत राहिन दूरावरच्या
क्षितिजावर लावुनिया डोळे;
मृगजल मात्र मुळीं न दिसावें !

करिसि उपेक्षा—साहिन तो घण—
वेदनेंतही उन्नत मस्तक राहिल उन्नत
— स्मित परिचित तें तुझिया ओठीं
मात्र नसावें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ०८७०५३ वि: ७१०८
क्रमांक २००५ नों दि: १८/३/०७

## झूल

सरला होता वाद–परंतू सरला नव्हता आशय—

निरोप घ्याया
वळणावर मग जरा थबकतां
मौनाला ओठंगुन कांहीं
शब्द राहिले चुकार, अस्फुट —
नव्हता त्या आकार मुळींही
रंगहि नव्हता,
रूपहि नव्हतें
— निरोप-घटिका लांबत होती
पळापळानें अशा दुव्यांनीं,
त्यांतच होतें त्यांचें सार्थक.

—- आणि क्षणिं त्या कळून चुकलें :
वादहि खोटा--शब्दहि खोटे -
परस्परांच्या सहवासाची
ओढ अनावर लपवायाची
झूलच केवळ ती जरतारी !

## अनुबन्ध

अनुबन्ध सम्पला हा
आतां जायचें येथून
कां हें घोटाळें पाऊल ?
असें अडवीतें कोण ?
दोन क्षणांच्या भासांत
गेले दोन दिस पूर्ण
पळसाच्या फुलावर
विसांवली आठवण
गवताच्या दंवावर
तुझ्या अधराचा ठसा
उमलत्या फुलांतून
तुझें गूज आलें रसा –
सांज होतां जलाशयीं
सांडे केशरी चांदणें
त्याच्या वलय मालेला
तुझ्या अंगुलीचें लेणें
तुझ्या श्वसन गंधानें
रोमांचित हिरवळ
अनुबन्ध सम्पे आतां
– आतां आवरावा खेळ
तुझा माझा सहवास–
त्याची गोडीच आगळी

तृप्ति गहिरी–मधून
अतृप्तीची सोनसळी !
अनुबन्ध सम्पला कां ?
हृदयांत ओली पण–
पळसाच्या फुलावर
विसांवली आठवण.

## खेळ

तुझी शाबास ! वठला
किती अभिनय छान
मीहि रंगलों तयांत
सारें जाणून-बुजून.

खेळ संपला ? नमस्ते !
नाहीं मुळीं खेद-खंत
नांदींतच नाटकाचा
होता हेरला मीं अंत ?

## जोंवर सन्थ आहे लाट !

अजून लाट सन्थ आहे--तोंवर मला जाऊं दे !
चुकतेस तूं-भिववीत नाहीं भोंवतालचा प्रलय मला
दीपगृहाचें पुसून स्वप्न, काळोखाचें पाणी तोडीत
पूर्वेकडे मारीन हात
पाय टेकतील किनाऱ्यावर, सोनवर्खी फुटेल पहांट
-बाहूंवरती विसांवूनहि त्यांचें कळत नाहीं बळ ?
तोंवर मला जाऊं दे-जोंवर तीव्र नाहीं कळ !
अजून मागें फिरतां येईल-जिकडे तुझे डोळे माझ्या
मिठींतूनहि वळत आहेत
जिथें प्रकाश निळा आहे, शब्द होतो धून
जिथें फूल फुलत आहे, जिथें घरटें झुलत आहे
मोहरलेल्या पालवींतून
ओळख त्याच्या आर्जवांतली हिंदकळणारी, हलती खूण !
पण आतांच !—आंतली लाट उधाण होईल,
तुझ्या माझ्या श्वासामधून त्याची गति उसळत राहील,
मग गति आहे तोंवर तुझी-माझी एक वाट
तोंवर मला जाऊं दे-जोंवर सन्थ आहे लाट !

## लाज

सर्वस्वाचे जीव-भाव
आधीं तुजला वाहिले—
मज माझें उमजलें
केव्हां तरी
कधीं तरी

आणि तूंहि नकळत
असा लाविलास लळा
उजळल्या सोळा कळा
एक एक
अपरूक

देणें-घेणें तुझें-माझें
सारें-सारें तुझ्यापाशीं !—
कां रे हिशोब मागसी
आकस्मिक
रोखठोक

तुझ्या ठायीं तृषा, तृप्ति
दोन्ही निरविल्यावर
पान्हा चोरशील तर
लाज मला
लाज तुला !

## खुणा कालच्या वादळी

खुणा कालच्या वादळी
आज पुन्हां शोधिसी कां ?
समजूत झाली—आतां
वृथा वेंचिशी कां शंका ?

आठविसी कशाला ते
शब्द माझे—तुझें मौन ?
माझें गर्जतें आकाश
तुझें स्तब्ध धरा-ध्यान !

न्याहाळून पाहासी कां
डोळां अपराधी भाव ?
एका दिसाचें गढूळ–
जळ निर्मळ सदैव !

आज मोतिया रंगांत
न्हालें प्रसन्न आकाश —
शांत, निःशंक धरणी
सोडी बोलके निःश्वास

अर्थच्छटांच्या फटींत
पुन्हां चांचपसी काय ?
निवाऱ्याच्या मुक्त क्षणीं
नको वादळाची सय !

## निर्विकार

ही शेलाटी बिजली
तरणीताठी
नाजुक, अटकर बांधा
डोळे मोडित लवलवते अनिवार
ऐन वयांतील धुंदी
— पायांवर जणुं नक्षत्रच पडलेलें
— कभिन्न काळे, प्रौढ दाटले मेघ
निर्विकार भंवतालीं !

## सर

ध्यानीमनीं नसतांना
आली अवचित सर
निमिषांत दर्वळला
लाल मातीचा मोहर

अशा वर्षावत आल्या
क्षणीं आकाशाच्या धारा
एकएका पात्यावर
लक्ष तुषारांचा तुरा

धुंद चढली गतीला
झालें सारें धुवांधार
डोळे बांधूनच घेई
भव्य, उत्कट, उदार !

शाप स्तब्ध जीवनाचा
सरे क्षणांत आणिक—
सळाळता, खळाळता
झालों मीहि थेंब एक !

आली तशी गेली सर
खूण उरली गहिरी :
इंद्रधनु उमटलें
अर्ध वरी, अर्ध उरीं !

## बाकी

तापलेलें मन माझें
अणुरेणु पेटलेला
लाल-पिंवळ्या रेषांची
त्यांत धगधगे ज्वाला

जागोजाग तडे--जणुं
जन्मकुंडली ग्रीष्माची
मधें धूळ-लोट उठे—
वक्रदृष्टि मंगलाची !

हिरव्याचें झालें स्वप्न
असा फुलला अंगार
कांटा उरला केवळ
झुडूपाच्या अस्थींवर

-- तोंच आलास छन्दांत
वेड्यापरी वर्षलास
आणि गेलास सहसा—
पुन्हां कढूं लागे श्वास

वर उफाळून आली
आंत दडलेली धग
बाकी : ओली सय आणि
तगमग, तगमग !

## सात दिवसांची

सात दिवसांची
संपली अखेर संतत झड !
धुंदकारलेले उन्मत्त प्रवाह
मन्थर झाले
तृप्त कामिनीच्या निःश्वसनापरि.
उजळे आकाश—
‘ दूषित यश ’ निर्मल झालेल्या
चारुदत्ताचें शीलच जणूं !
झिमझिम—छे !–
कृतापराधाची नित्य कणकण पोखरणारी
टोंचणी थांबली !
सुस्तीच्या शापांत गळून पडलीं
वेलींचीं फुलें, मानवी मनें
त्यांच्या उःशापाची आज उमलली सुवर्णघटिका!
उजळे बिम्ब हिरण्यगर्भाचें
कोवळ्या तेजाची करीत सभोंतीं सौम्य पखरण
आलें गोंजारीत
गवती फुलांना, पोपटी पात्यांना,
सुरूंच्या शिरांना
उबारा देत भिजल्या पंखांना,
आलें भूषवीत सोनपावलांनीं
तिरपीं छपरें शेवाळलेलीं,
प्राण फुंकीत प्रसन्नतेंत–

आणि हलकेंच
कुरवाळीत
माझ्या हृदयींच्या
उत्कट सुखाच्या
नाजुक, उत्कण्ठ आठवणींना !

वळीव

अशी भिजतें–नाहतें
तुझ्या मुक्त वर्षावांत
ओल्या गंधाने तृप्तीच्या
घुसमटे श्वास आंत

माथ्यावर–खांद्यावर
घेतें आसासून सर
लवतें मी--वाकतें मी
झेलतें मी धार-धार

वस्त्र पिवळें भिजलें
तळीं गळाला पदर
झालें निःसंग--निःसंग
धर धार वक्षावर

प्रतीक्षेच्या वेडावर
आज मोहरला स्पर्श
स्वप्न संपलें केव्हांच–
आतां रोमांचला हर्ष

कां रे, निघालास असा ?
कशी ओळखेना खूण :
तृप्त–तृप्त होऊनहि
माझी अतृप्ति सरे न !

## वर्षूं नकोस रे असा

वर्षूं नकोस रे असा—
असा सहस्रधारांनीं
कसा झेलूं थेम्ब-थेम्ब
तर्र झालें कणोकणीं

तुझा देतां हात कधीं
तुला आवरत नाहीं
वर्षे आकाश जिंकून
तुझी अनन्त पुण्याई

—दोन हातांची ओंजळ
माझी केव्हांच भरली
कळ नव्हाळ सुखाची
अंगीपांगीं ओथम्बली

तुझ्या वर्षावाची लय
तरी दुणावत राही
फुलीं फुलला हर्ष हा
आतां सोसवत नाहीं—!

अशा आगळ्या तृप्तीचें
मला लुटवूं दे धन
थाम्ब जरा, थाम्ब गडे,
[ दूर अजून आश्विन ! ]

## तुझ्या थेम्बांचा उतरो

तुझ्या थेम्बांचा उतरो
इथ फूलपंखी थवा
तुळशीची मञ्जिरी मीं
इथें चुरिली परवां—

लक्ष हत्तींच्या दळांत
फुंक तुताऱ्या सहस्र—
कृष्णसाळीवर माझ्या
फेंक सृजनाचें अस्त्र

पड पिञ्जून,पिञ्जून
श्रावणाच्या माण्डवांत
माझी बकुळ शालीन
वाट राहील पाहात

ये रे कसाहि-केव्हांहि
ऊर रुखावळ झालें
तुझ्या स्पर्शें कटिखांदीं
गीत घोसांचें जागलें !

## नाहीं मावत डोळ्यांत

नाहीं मावत डोळ्यांत
  रात्र अशी जरीकांठी
  तारा वेंचतेच दिठी

कसें मिठींत हें घ्यावें
  निळें-सावळें आकाश;
  माझा रोखलेला श्वास.

तृप्त, अथांग मौनाचा
  भाव कळून, कळेना;
  गोंधळल्या शब्द-खुणा.

आकाश तें, तारका त्या,
  स्तब्ध तशीच ही रात्र;
  हरवलों मीच मात्र !

## तृप्त

मी बघतों या दो बाहूंनीं कवळाया आकाश
ओथम्बुनि आलेलें
वर्षेच्या सुखश्यामल वत्सलतेनें
    —ज्यांतुन लवते विजली रेखित सीमा
ओसरल्या जेष्ठाची;
    —उभी स्तब्धता घुसमटलेली जेथ अधोमुख
बान्धुन हात उराशीं,
घेउन खान्द्यावरती
शुभ्र थवे शब्दांचे
मिटलेल्या पंखांच्या;
    —ज्यांत घुसळतें वादळ उत्कण्ठेचें
धडधडणारें !

आणिक जेन्हां सळसळती जलधारा
सुटती धांवत पायांखालुन लोट जळाचे लाल
वाऱ्याचा उन्माद सुगन्धित
आरपार या रंध्रारंध्रांतुन सोसाटत जातो—
    —कवळायाला कांहिं न उरतें तेव्हां,

मीच तेधवां होतों
वर्षेतिल आकाश
वर्षेमधल्या वत्सलतेनें तृप्त !

## हस्त

हस्ताचा पाऊस स्वच्छन्द लहरी दौडत आला
साळीच्या शेतांत रुचीचें गुपित पेरून गेला
सायंकाळचीं सोनेरी उन्हें भिजलीं सारीं
किर्मिजी शेताला खळाळती कड शोभे केशरी
इथल्या पोपटी पांखरांच्या उरीं हललें सुख
ओलेत्या पंखांत लवते हर्षाची वीज नाजुक

तरारून येतें माझिया उरींचें हिरवें गीत
सायंकाळच्या भिजल्या उन्हांत डोलत, न्हात;
निंबाच्या पालव-शेल्यांत क्षणच राहतें स्वस्थ—
उत्कण्ठ होऊन भरारे स्वच्छन्द लुटीत हस्त !

## नातें

नातें माझें रक्ताचें
मृगहस्तांशीं
आर्द्राआश्लेषांशीं
पुनर्वसूच्या अभ्राच्छादित कलत्या चौकोनाश
नाजुक, इवल्या पुष्याच्या त्रिदलाशीं ! !

नातें माझें मन्थर, श्याम घनांशीं,
कडकडत्या गगनाशीं
जडलेले अनुबन्ध जिवाचे झरत्या जल-तारांशीं,
कोसळत्या धारांशीं
आषाढाच्या सतत झडीशीं
श्रावणांतल्या उडत्या सोन-सरीशीं
-- वळवाच्या लहरीशीं --
-- लवत्या गति-रेखेशीं माझा उज्ज्वल लागाबांधा.
धरतीचें तें हिरवें अमृत नसांत माझ्या वाहे
मातीचा संजीवक परिमळ मी उच्छ्वासत आहें !
लय माझ्या स्पंदनांत वेडी दुथडीच्या भरतीची
उच्छृंखल सरितेची !

नातें माझें रक्ताचें
त्या साक्षात् प्रलयाशीं
ज्यांत वर्षती संतत भैरव मेघ सहस्र मुखांनीं
आंदोलन ज्याचें उधळी बांध दिशांचे

जलतांडवीं ज्याच्या विरघळतें ब्रह्मांड
-- ज्यांतुन फुटतें वटपर्णीवर
मधुर स्मित करणारें
नवजीवन लडिवाळ !

## पाऊल

आजूबाजूच्या शान्तीला मुळीं नांवच नसावें
एकान्ताच्या कानामधें फूल मौनाचें असावें

मला मी-पण नसावें तुला नसावें तूं-पण
रुचि घेत, थबकत जावा एक एक क्षण

वेढणाऱ्या अन्धाराला वास तृप्तीचा असावा
विसांवून धरणीनें सार्थकाचा श्वास घ्यावा

चन्द्र उगवूंच नये रात्र व्हावी निळी भूल
आंत मात्र पुनवेचें गोरें ठसावें पाऊल.

## खूण

खरें वाटेना इतुकें नभ निर्विकार
अनिवार ताणलेली स्तब्धतेची तार

कान उभारून पान--पान सावधान
भय उरीं आवरीत मूक उभें रान

केव्हांचेच घरट्यांत दडालेले पंख
उष्ण गति पाचोळ्याला करूं पाहे डंख

जित्या विजेनें भारली दिसे लाल धूळ
टेंकविलें बोट मात्र--दाबायची कळ...

--दीपकळी निवाऱ्याला ठेवितें जपून
रुद्ध श्वासामधीं आहे वादळाची खूण !

## त्यांची आशा, स्वप्नें त्यांचीं—

--त्यांची आशा, स्वप्नें त्यांचीं
कवळाया तीं पंख फुटावे
आकाशासहि
उत्कंठेनें पुलकित व्हावें ऊर धरेचें
इंगित त्यांतिल कळुन झुलावें
नदिकांठावर रानफुलांनीं,
तृणपात्यांनीं-- !

-- त्यांची आशा, स्वप्नें त्यांचीं
अग्निशलाका त्यांत झळाळे दधीचिच्या अस्थींची
कवचकुण्डलें प्रभा ढाळिती त्यांवर कौंतेयाचीं
उधळी तेथें अमृतबिन्दू मीरेचा विषप्याला
वत्सलता घे अस्पृश्याचें पोर कडेवर
'संभवते' पदयात्रा अथवा
आर्तत्राणासाठीं...

-- आणि निराशा, अपेश त्यांचें --
ऊर्ध्वबाहुमधिं अवघडलेलें तें 'नच कश्चिद्...'
'हे अज्ञानी, क्षमा करीं या !...'
अलौकिकाचा दरवळ यांसहि --
प्रकाशवेड्या तिमिरावर या
शतदां कुरवण्डुनि टाकावीं
तुमचीं, माझीं, यांचीं स्वप्नें --
यश, सार्थकता, तृप्ति !

## जाब

तिरीमिरींत झांपून
मन ताठ उभें राही
जाब झाल्या अन्यायाचा
घ्याया नभ फोडूं पाही.

येतां अंदाज बळाचा
होई अवसान--घात
कोसळून पडे मन
बसे दांत--ओठ खात !

' होतं असं ! ' ' चालायाचं ! '
जग घालितें फुंकर
" काय बोलतां मर्दांनो,
थुंका माझ्या तोंडावर ! "

—हेंहि मनांतच पण—
त्वेष हाहि विझे मग,
सुख दुबळें चाटीत
मीहि आणि होतों जग.

## लव

पहांटेच कधीं
समोरच्या गर्द निंबतरूच्या
नाजुक नक्षीच्या मोहरांतून
उडून जातो एखादा पक्षी
आपुल्या इवल्या पारव्या पंखांची
करीत कोवळी, संथ हालचाल --
बघतां बघतां होतो दिसेनासा !
– उगीच आणि
दिवसाचे सारे रुक्ष व्यवहार उरकतांना
हुळहुळते
मनाच्या कठोर पात्यावरती
हळवी, रेशमी, पारवी लव.

## बळ

काय सलतें या उरीं
  नका काढूं ओळखून
माझी मलाच सोसूं द्या
  कळ त्याची ऊन-ऊन

कुठें चुकला हिशोब
  कुठें हातचा राहिला --
माझें माझ्यापाशीं ! -- नको
  शब्द सान्त्वनाचा ओला

अशी जिव्हाळ्याची लाट
  तट लंघून जाईल —
जळ इथेंहि पोचतां
  कसें सांवरूं मी बळ ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७८७५३ वि: ...... ...
२००५ नों दि: ९/८/३१/७९

सातवें बन्द दार

सातही महालांची
माझिया हातीं कळ
— सहसा नवलाचें
लाधलें पुण्यफळ --

" उघड सहा दारें
सातवें नको खोलूं
डोळ्याच्या निळाईनें
आकाश नये तोलूं ! "

पहिल्या महालांत
रूपाचा नाचे मोर
लावण्य आपुल्यांत
गुंगून धरी फेर !

दुसऱ्या महालांत
शब्दच होई छन्द
हळवा स्पर्श झाला
गन्धांत कुठें धुन्द

रसाचे मेघ कोठें
पिकून ओथंबती
तालांत सार्थकाच्या
झुलते कुठें तृप्ति !



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९८८३७
(स्थळ प्रत)

परि न जीव तृप्त
एकाहि महालांत
सातव्या कवाडाचें
छळतें एक आर्त

असून हातीं कळ
मन हें अनावर
कपाळ फोडूं पाहे
सातवें बन्द दार

असून अट तेढी
सातवें कसें खोलूं ?
डोळ्याच्या निळाईनें
आकाश कसें तोलूं ?

## उगीच कां हें—

उगीच कां हें असें फसावें ?
वृथा जनांनीं तुला हंसावें ? --
असह्यतेच्या क्षणीं अनावर
मींच आपुलें मला पुसावें ?

परि जातां तो ओसरुनी क्षण
नकळत घे मज बन्धन वेष्टुन
फिरून फसणें, हंसणें; फिरुनी
मींच मला पुसणें उद्वेगुन !

## कडी

निल्याचेंच दुःख होतें
उशागतीं बसलेलें
त्याच्या रेंगाळत्या स्वरीं
मन होतें फसलेलें

फसलेल्या मनीं होती
एक पोकळी विशाल—
दूरावर मात्र कुठें
होती जरा हालचाल !

तोंच अवचित आलें
सुख ठोठावीत दार
-- परि फसलेलें मन
आणि माथ्यावरी भार -

कडी काढितां उशिरा
दूरावर पाठमोरें --
सुख दिसे चालतांना;
शून्य मात्र आंत उरे !

## माथां कृत्तिकांचा घोंस—

माथां कृत्तिकांचा घोंस
अंगीं चांदण्याची उटी
ल्याली कांचोळी जुईची
-- अशी एक एक स्मृति.

केशराच्या उन्हामधें
लेणें कोरलें आगळें
भविष्याचें एक एक
स्वप्न तसें झळझळे

-- दोन्ही डोळ्यांनीं पाहातों
स्मृति, स्वप्न नटवून
जाग निखळे आजची
नकळत हातांतून

## वर निःस्तब्ध आकाश—

वर निःस्तब्ध आकाश
इथें-तिथें शेतें रुखीं
एकसुरी वाट लाम्ब
पायतळीं धूळ मुकी

खेद-खन्त गेल्यापरि
मन अलिप्त, निवान्त
कांहीं विचूक आठवी
कांहीं घोळवितें सन्थ

--कधीं चुकलें गणित
कुठें जिंकलेली स्पर्धा
कुण्या मिठींत सांजचा
गोड झाला पेरू अर्धा

कधीं उभारले पंख
तोंच उन्मळला वृक्ष,
अवचित अर्ध्यांवर
पुसे वात्सल्याची साक्ष

कधीं घेतलेली झुंज
जीवघेणें झेलूनहि,
कुठें केवडा यशाचा
गंध उधळीत राही...

-- अलिप्तता मोडलेली,
शेतें होतात बोलकीं,
लवे आकाश स्नेहानें
वाट लाम्बते सारखी —

## बंगला रुप्याचा बान्धीन

बंगला रुप्याचा बान्धीन
कौलं घालीन सोन्याचीं
कांच दाराला चंद्राची
राणी, तुला रुचेल ना ?
" ऊंहूं, ऊंहूं ! "

चाल घोळ सांवरीत--
साडी रुपेरी ढगाची
चोळी कांचन-मृगाची
राणी, तुला रुचेल ना ?
" ऊंहूं, ऊंहूं ! "

तुजसाठीं तोडीन मी
पिकल्या अमृताचें फळ
आकाशींचें गंगाजळ
राणी तुला रुचेल ना ?
" ऊंहूं, ऊंहूं ! "

किती दाविशील तोरा -- !
नेस जुनेर सुताचें
भाज कणीस मक्याचें
सोड आडांत घागर
विश्रांतीला माजघर
राणी, तुला रुचेल ना ?
" हूं हूं, हूं हूं ! "

## वाचन

" माझी बोबडी साळुंकी
इथें वाचीतसे धडा
राघू, मीट तोंड जरा

म्हणे ' उलटें पुस्तक ' !---
भाऊ, नवीच रीत ही
तुला कळतच नाहीं !

किती बारीक अक्षर
अडखळते म्हणून;
चष्मा आजोबांचा आण.

नका करूं गलबला
जरा वाचूं द्या--सुचूं द्या
तास ' कॉलिजां 'त उद्यां "

तोंच अवघडे हात
– पेंग डोळ्यांत दाटली --
ग्रंथ कोसळला खालीं !

## चांदणं

अंगणांत चांदणं पडलं ग--पडलं ग
बाळाचं रडणं दडलं ग
पायरीवर चांदणं चढलं ग --चढलं ग
गुंगीचं लेणं घडलं ग
ओटीवर चांदणं बसलं ग--बसलं ग
झोपेंत छकुलं हसलं ग
घरांत चांदणं शिरलं ग-- शिरलं ग
सुखानं उर माझं भरलं ग

## ऐट

दृष्ट लागावी माझीच
ऐट अशी झाली सारी
-- वाटतें का वारंवार
राहिलेंच कांहीं तरी ?

तऱ्हा केल्या सात--मग
भाळीं रेखिलें स्वस्तिक
चंदनाची गोरी कळा
आली फुलून अचूक

बटा वळण घेऊन
कानीं सांगतात गूज
डूल खटयाळ डोलती
ऐकतां ती कुजबूज

पाय टाकते असा कीं ,
शोभा बुटांची खुलावी
सोन-किनार फ्रॉकची
पुन्हां पुन्हां उजळावी

दृष्ट लागावी माझीच
झाला असा न्यारा थाट
-- विसरलें कशी ? नाहीं
गालीं काजळाचें बोट !

## आकस्मिकतेनें

आकस्मितेनें जलाल केलेला आघात करण्यासाठीं
तें विराट दु:ख अस्मानांतून उल्केच्या वेगांनें
उतरलें खालीं——त्याच्या सहस्र नखांच्या पंजांत
मूर्च्छेतून सावध झाल्यावरच, मला त्याच्या
चारी दिशांनीं वेष्टून बसलेल्या काळ्या छायेची जाणीव झाली.
माझी कोणतीहि हालचाल त्याच्या नखांत रूतत होती.
सान्त्वनाच्या सख्य-शब्दांतहि त्याच्या सांवलीचें काळें विष
भिनत् होतें. सारें विच्छिन्न झालें होतें, त्याहून तीव्र होती
विच्छिन्न झाल्याची जाणीव !

—आणि एक दिवस मला चाहूल लागली माझ्या उरांतून
फुटणाऱ्या अंकुराची. त्या काळ्या सांवली तोहि वेष्टिलेलाच आहे —
पण त्याची दृष्टि ऊर्ध्व आहे. त्या विषानें तोहि काळवंडलेला आहे—
पण मान टाकीत नाहीं. त्याला जाणीव आहे. आकाश-स्वस्तिकांत
हिरण्यगर्भाच्या तेजाचें तळें झळाळत आहे.
याच्या जागृत झालेल्या कुंडलिनींत तें कधींतरी कानडें होणार आहें !

## फेड

तुवां वेंचिलें -- तयाची
  फेड कधीं होईल कां ?
तुझें देणें आभाळाचें
  माझा रांजण गळका !

फेड अशक्य, उमजे :
  ऋण तुझें मिरवावें
वाटे तरी : तुझ्यासाठीं
  रोज एकदां जळावें.

मात्र आणीबाणी येतां
  पाय घेतात माघार
शरमेनें माझा मीच
  ठार होतों वारंवार

तूंच पुन्हां आणिसी तों
  सांत्वनाचा शुभ्र वर
तुझ्यासाठीं जळायला
  पुन्हां जीव हो आतुर !

-- तुवां वेंचिलें, तयाची
  फेड कधीं होईल कां ?
तुझें देणें आभाळाचें
  माझा रांजण गळका !

## गळां गौरवाचे हार

गळां गौरवाचे हार
माझे भिजतात गाल
सांहू कशी -- यशानेंहि
आज होई ऊलघाल !

सुख आतांच जरासें
माझ्या ओसरीला आलें
तोंच कष्टतें वात्सल्य
घडा कलण्डून गेलें --

आतां कशाकशानेंहि
निरून भरून येईना
आतां गौरव सोशील
नित्य आसवांच्या वेणा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १४८३८

## काव्यनिर्मितीचा काल-स्थलनिर्देश

REFBK-0014837

REFBK-0014837

| | | |
|---|---|---|
| १ उघड्या डोळ्यांनीं | १७:११:५४ | बेळगांव |
| २ माझा कणी–कोण्डा | ६: ३:६२ | औरंगाबाद |
| ३ चंदन | ३१: ८:५६ | बेळगांव |
| ४ व्रत | १: १:५८ | बेळगांव |
| ५ प्रश्नोत्तर | ३१: ८:५५ | बेळगांव |
| ६ अन्ध | २७: ९:५९ | बेळगांव |
| ७ दुष्ट | २३:१०:५९ | बेळगांव |
| ८ कसब | १७:१२:५७ | बेळगांव |
| ९ लेणें | ६:१०:६० | बेळगांव |
| १० अशान्त | १८:१२:५७ | बेळगांव |
| ११ डोह | १७:१२:५७ | बेळगांव |
| १२ वेड | २:१२:५७ | बेळगांव |
| १३ गे तुजला सांगूं का ? | १६:१२:५७ | बेळगांव |
| १४ बान्ध | ५: ३:५६ | बेळगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | वारंवार उसळून | ३: ७:६३ | बेळगांव |
| १६ | धीट | ३: ४:५६ | बेळगांव |
| १७ | शपथ | ८:११:५५ | चिंचली |
| १८ | न कळत येतों | २१: ५:५३ | नाशिक |
| १९ | उभा नटतों हर्षानें | २७: ८:६४ | बेळगांव |
| २० | स्पर्श | २२:१०:५७ | बेळगांव |
| २१ | अंकुर | २४:१०:५९ | बेळगांव |
| २२ | सावध | २४:१२:६१ | बेळगांव |
| २३ | अट | १७:११:५४ | बेळगांव |
| २४ | झूल | २८: ८:५४ | बेळगांव |
| २५ | अनुबन्ध | ३०:१०:५५ | बेळगांव |
| २६ | खेळ | ४:१२:५७ | बेळगांव |
| २७ | जोंवर सन्थ आहे लाट ! | १: ३:६३ | बेळगांव |
| २८ | लाज | १७: ९:६१ | बेळगांव |
| २९ | खुणा काल्च्या वादळी | १४: ३:६२ | बेळगांव |
| ३० | निर्विकार | १९: ८:५७ | बेळगांव |
| ३१ | सर | २६: ९:६० | बेळगांव |
| ३२ | बाकी | ६:१०:६० | बेळगांव |
| ३३ | सात दिवसांची | १५: ८:५६ | बेळगांव |
| ३४ | वळींव | ८: ९:६३ | बेळगांव |
| ३५ | वर्षू नकोस रे असा | ६: ९:६३ | बेळगांव |
| ३६ | तुझ्या थेम्बांचा उतरो | ७:१२:६३ | बेळगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | नाहीं मावत डोळ्यांत | २८: ९:५९ | बेळगांव |
| ३८ | तृप्त | १८: ८:५७ | बेळगांव |
| ३९ | हस्त | —:—:६३ | बेळगांव |
| ४० | नातें | २८: ९:६० | बेळगांव |
| ४१ | पाऊल | ९: २:५८ | बेळगांव |
| ४२ | खूण | १३: ६:६१ | बेळगांव |
| ४३ | त्यांची आशा, स्वप्नें त्यांचीं | १४:११:५५ | बेळगांव |
| ४४ | जाब | १६: १:५८ | बेळगांव |
| ४५ | लव | २१: ३:५६ | मालवण |
| ४६ | बळ | १६: ६:६४ | बेळगांव |
| ४७ | सातवें बन्द दार | ११: ४:६४ | बेळगांव |
| ४८ | उगीच कां हें– | १८:१०:५४ | बेळगांव |
| ४९ | कडी | १९: १:५३ | बेळगांव |
| ५० | माथां कृत्तिकांचा घोंस– | ३१:१२:५७ | बेळगांव |
| ५१ | वर निःस्तब्ध आकाश | २६: ८:६३ | बेळगांव |
| ५२ | बंगला रुप्याचा बांधीन | १६: ५:५८ | बेळगांव |
| ५३ | वाचन | ३०: ९:५९ | बेळगांव |
| ५४ | चांदणं | १९: ५:६१ | बेळगांव |
| ५५ | ऐट | २१: ८:६३ | बेळगांव |
| ५६ | आकस्मिकतेनें | १: ११: ६२ | बेळगांव |
| ५७ | फेड | २३: ८:५७ | बेळगांव |
| ५८ | गळां गौरवाचे हार | ८:११:६३ | बेळगांव |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
आंक ........ नोंद दि ........